जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १५७ दिनांक - ११/०३/२०२५**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## आयुर्वेदिक उपचार केंद्रामधील कामगार महिलांचे व्हिडीओ रेकॉर्ड करुन सदरचे व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी देवुन त्यांचेकडुन खंडणी गोळा करणारे व गल्यातील पैशांची जबरदस्तीने चोरुन नेणारे आरोपीतांना केले अटक

दि.०३/०२/२०२५ रोजी फिर्यादी हे आयुर्वेदिक उपचार केंद्र धनवकडी पुणे येथे नोकरीस असताना दोघेजण आयुर्वेदिक उपचार केंद्रात येवुन त्यांनी आयुर्वेदिक उपचाराची माहिती विचारली असता मी त्यांना माहिती देवुन उपचारासाठी साठी कोणते तेल वापरायाचे आहे असे विचारले असता त्यांनी तीळाचे तेल वापरण्यास सांगितले. त्या कस्टमरने मला १ तास उपचार घ्यावयाचा आहे असे सांगितल्याने त्यावेळी त्याने त्याचे नाव रोहित वाघमारे असे असल्याचे सांगितले. उपचारा दरम्यान त्याने फिर्यादीला धमकाविले त्यावेळी **त्याने मी एका पक्षाचा अध्यक्ष आहे. तु जर मी सांगेल तसे उपचार केले नाहिस तर तुझे आयुर्वेदिक उपचार केंद्र बंद करुन टाकेन असे सांगुन जबदरस्तीने उपचार करुन घेतले**. त्यानंतर थोड्या वेळाने २ ते ३ इसम रोहित वाघमारे याचे सोबत आले व आम्हाला २०,०००/- रुपये दे नाहितर तुझा उपचार करीत असताना न कळत काढलेला व्हिडीओ दाखवुन हा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यावेळी आमचेकडे पैसे नसल्याने कांऊटरमध्ये ठेवलेले ८००/-रुपये जबदरस्तीने घेवुन गेले त्याबाबत सदर इसमाविरूध्द दिनांक ०६/०३/२०२५ रोजी **सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.९४/२०२५ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०८(२),३०९(४),७४,७९,११५(२),३५२,३५१(२),३(५) प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचा तपास सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल गौड यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील पोलीस अधिकारी सपोनि सागर पाटील व स्टाफ असे तपास करीत असताना तांत्रीक विष्लेशन करुन, संशयीत आरोपींचे ठाव ठिकाण्याबाबत माहिती प्राप्त करुन, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथील पोलीस स्टाफचे मदतीने आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांचे नाव पत्ते विचारले असता त्यांनी **१) रोहीत गुरुदत्त वाघमारे वय २९ वर्षे मुळ रा.यशोदीप चौक चौधरी बिल्डींग वारजे माळवाडी पुणे २) शुभम चांगदेव धनवटे वय २० वर्ष रा. गणराजज कॉम्प्लेक्स फ्लॅट नं.१०९ दुसरा मजला आहिरे गेट उत्तमनगर,पुणे ३)राहुल ज्ञानेश्वर वाघमारे वय ३६ वर्ष रा. स.नं.४४ एसआरए बिल्डींग मामासाहेब मोहळ शाळेसमोर केळेवाडी पौड रोड कोथरुड,पुणे** असे सांगितले. त्यांचेकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी दाखल गुन्हा केल्याची कबुली देवुन सदरचा प्रकार पुणे शहरातील वेगवेगळया ७ ते ८ ठिकाणी केला असल्याचे देखील सांगितले आहे. **सदरचे आरोपींना मा.न्यायालयाने दिनांक १२/०३/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.**

अटक आरोपीतांकडे अधिक तपास करीता यातील आरोपी क्रमांक १) रोहित वाघमारे याचे विरुध्द वारजे पोलीस ठाणे गु.रजि.नं. ५०७/२०२१ भांदवी ३५४ अन्वये गुन्हा दाखल आहे. तसेच आरोपी रोहित वाघमारे व आरोपी शुभम चांगदेव धनवटे याचे विरुध्द अंभोरा पोलीस स्टेशन बीड गु.रजि.नं. २०८/२०२४ भा.न्या.संहिता ३०४(४) अन्वये दाखल आहे. तसेच पाथर्डी पो.स्टे. जि. अहमदनगर गु.रजि.नं. ८५०/२०२४ भा.न्या.सं. ३०९(६) अन्वये दाखल असुन सदर गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याची माहिती मिळाली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२,पुणे श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे श्री.राहुल आवारे, सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल गौड,पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्रीमती सुरेखा चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक सागर पाटील, सहा.पोउपनिरी बापु खुटवड, पोलीस अंमलदार अमोल पवार,बजरंग पवार,महेश मंडलिक,सागर सुतकर,किरण कांबळे,चंद्रकांत जाधव, निखील राजीवडे,प्रदिप रेणुसे,आकाश किर्तीकर,महेश भगत,अमित पदमाळे,योगेश ढोले,खंडु शिंदे यांनी केली आहे.

